# महाराष्ट्र मंडळ सिंगापूरचे वार्तापत्र

# ऋतुगंध

## वसंतऋतु



## संपादकीय

श्री. अनिल केळकर

मित्रहो नमस्कार!
सर्वप्रथम तुम्हा सर्वांना गुढीपाडव्याच्या हार्दिक शुभेच्छा!

पाडवा म्हणजे हिंदुंच्या नव्या वर्षाची सुरूवात. महीना अर्थातच चैत्र. निरभ्र निळंशार आकाश असलेला सोनेरी चकचकीत उन्हं पांघरलेला, फुलणारा रसरशीत महीना. सगळीकडे नाविन्याची ओढ. हिरवीगार नवी पालवी आणि कोकिळेचा पंचम. खरंच नव्या वर्षाचे स्वागत असेच व्हावे थाटात. म्हणूनच फार पूर्वीपासून चैत्र हा पहिला महीना योजीला असावा आणि त्यातला पहिला दिवस सण म्हणून साजरा करण्याची प्रथा पडली असावी.

आपल्या सणांची हीच तर गंमत आहे. निसर्गातल्या निरनिराळ्या उत्सवांना अनुसरून उत्सव. रंगपंचमीबद्दल बोलताना एकदा पू. ल. म्हणाले होते की रंग खेळण्याची प्रथा फाल्गून महिन्यात का सुरू झाली असेल. मला वाटतं हा मौसम अनेक रंगबिरंगी फुलांचा असतो म्हणून. रस्त्याच्या दुतर्फा गुलाबी जांभळ्या पिवळ्या फुलांनी लगडलेली झाडे दिसतात. लालभडक गुलमोहोरही फाल्गुनापासून बहरत बहरत जातो आणि म्हणूनच कदाचित आपण आपल्या अंतरंगातल्या रंगांना साद घालतो आणि रंग गुलाल उधळतो. ब्रम्हांडी ते पिंडी याची साक्ष पटते. क्या बात है!!

मित्रहो तुम्हाला वाटेल हा सगळा ऊहापोह कशासाठी. कारण तसेच आहे. निसर्गातल्या आणि आयुष्यातल्या विविध ऋतुंचा दरवळ घेऊन येणारे एक bi-monthly eNewsletter आपण सुरू करत आहोत **"ऋतुगंध"**. संपर्क साधणारा एक नवा पूल. अधिक सहवासातून आपुलकी वाढावी या हेतूने बांधलेला.

तो जमुरे और क्या होगा इस bi-monthly eNewsletter मे? बातम्या, मंडळाच्या आगामी कार्यक्रमांविषयी, उपक्रमांविषयी. तुम्हाला तयारी करायला अधिक वेळ मिळावा म्हणून बऱ्याच अगोदर देण्याचा प्रयत्न करणार आहोत. त्याचबरोबर थोडी इतर माहिती. तुमचे छोटेखानी लेख व कविता. बच्चे कंपनीच्या लिखाणाला प्राधान्य. असा सध्याचा विचार आहे. आपल्या सूचना विचारात घेऊन पुढची वाटचाल करू.

बरं तर मंडळी तुमच्या प्रोत्साहनाची आशा आहे.
भेटुया ऋतुगंध मधून

आपला
अनिल केळकर

## वसंतऋतु



श्री. जितेंद्र देशपांडे

# अध्यक्षांचे मनोगत

सस्नेह नमस्कार!

आपणा सर्व महाराष्ट्र प्रेमी मंडळींना नवीन वर्षाच्या मंगलमय शुभकामना. सिंगापूरच्या महाराष्ट्र मंडळाचा अध्यक्ष ह्या नात्याने आपले सर्वांचे नवीन कार्यकारिणीच्या कारकिर्दीतील पहिल्या कार्यक्रमात मनःपूर्वक स्वागत. आपण सर्वांनी अत्यंत विश्वासाने मंडळाच्या कार्याची ध्वजा आमच्या खांदयांवर दिली त्याबद्दल माझ्या संपूर्ण कार्यकारी मंडळाच्या वतीने मी आपणा सर्वांचा आभारी आहे. हा विश्वास सार्थ करण्याचा आम्ही सर्वजण पूर्ण प्रयत्न करू. अर्थातच यासाठी आपल्या सर्वांचे सहकार्य लाभेलच यात आम्हाला तिळमात्रही शंका नाही.

एक तपाहुनही अधिक काळ आपल्या प्रगतिची कमान ऊंचावत नेणाऱ्या मंडळाला गत वाटचालीमध्ये अनेक नवनवीन आयाम मिळाले आहेत. यशस्वीतेच्या अनेक क्षेत्रामध्ये मंडळाने आपली घोडदौड अविरत सुरू ठेवली आहे. सांस्कृतिक संवर्धनाचा घेतलेला वसा तेवढयाच मोलाने जपत असताना आपल्या सर्वांगीण उत्कर्षासाठी आपण आज अनेक प्रांत सर करण्यासाठी निघालो आहोत. माय मराठीशी आपली नाळ जोडून विठूमाऊलीच्या गजरात लेझीमच्या जल्लोशात भान विसरणारे आम्ही तेवढयाच वेगाने ... **MMS Idol** च्या मंचावर तळपून जातो. मराठी बालगीतांच्या तालावर डोलणारी चिमुकली पावले बघताना आपली मने हिरवे हिरवे गार गालिचे पुन्हा एकदा स्पर्शून येतात.

संपन्न वाङमयाचा वारसा लाभलेले आम्ही येथे येऊन सुध्दा आपली वाचन क्षुधा भागविण्यासाठी धडपडत आहोत. ह्याच धडपडीमधून **1600** च्या वर पुस्तके असणारे **ग्रंथालय** आज एक स्वयंपूर्ण प्रकल्प म्हणून उभे आहे. अर्थातच ह्या सर्वामागे भक्कमपणे उभे आहेत ते **170** पेक्षा अधिक वाचक अनेक देणगीदार आणि निस्वार्थी स्वयंसेवक. ह्या ग्रंथदिंडीचे वारकरी होण्याची विनंती मी आपणा सर्वांना करतो.

संपन्न लेखन प्रतिभा लाभलेले आपले अनेक सदस्य बहारदार शाब्दिक कोपरखळ्या सुध्दा तेवढयाच सहजतेने मारतात. कवीच्या कल्पनाविलासाला भाषेतील कोणताही शब्द वर्ज्य नही हे दाखवून देण्याची रंगत रंगते ती मंडळाच्या **शब्दगंध** ह्या मंचावर. कवी कवयित्रींच्या ह्या मासिक मैफिलीमधूनच अनेकांनी केवळ महाराष्ट्रच नव्हे तर अमेरिकेपर्य तसुध्दा आपली काव्यध्वजा रोवली आहे. ह्या प्रतिभेची थोडीशी झलक आपल्या सर्वांना लाभते ती मंडळाच्या वार्षिक गणेशोत्सवात.

## वसंतऋतु

अशा ह्या वैचारिक, सांस्कृतिक, वांङमयीन वाटचालीसोबतच आता आम्ही आर्थिक क्षेत्रामध्ये सुध्दा मराठी छाप सोडतोय. स्वतःचा व्यवसाय असणाऱ्या किंवा तो सुरू करण्याची मनिशा बाळगणाऱ्या सर्वांकरिता “Lets network… it works!!” असे ध्येय घेऊन मंडळाने **Business Networking Group (BNG)** चा पाया घातला. जुन्या नव्या लहान मोठ्या अशा सर्वप्रकारच्या उद्योजकांनी एकमेका करू सहाय्य अवघेची होऊ संपन्न ह्या दिशेने वाटचाल सुरू केली आहे. ह्या उपक्रमामध्ये जास्तित जास्त उद्योगप्रेमी मंडळींचा झालेला सहभाग निश्चीतच मंडळासाठी अभिमानाची बाब ठरेल.

**आजच्या सुमुहूर्तावर आपण एक नविन अभियान सुरू करूयात. “एक सभासद, एक देणगी, एक पुस्तक”. येत्या वर्षभरात आपण प्रत्येकानी मंडळाला किमान एक नविन सभासद, एक देणगी आणि ग्रंथालयाला एक नविन पुस्तक देण्याचा संकल्प करूया.**

**ह्या अभियानामध्ये प्रत्येकाने आपले जास्तित जास्त योगदान करावे हे आवाहन मी सर्वांना करतो.**

मंडळाच्या सर्वक्षेत्रातील प्रगतीचा सुगंध आपणापर्यंत पोहोचविण्यासाठी सुरू झालेल्या **ऋतुगंध** ह्या हितगुजीची पहिली आवृत्ती आपल्या हाती देताना आम्हाला अत्यानंद होतोय.

महाराष्ट्र मंडळाच्या यशाचा परिघ वाढता ठेवण्यास मदत करणाऱ्या सर्व सभासदांचे देणगीदारांचे आजीव सभासद आणि सल्लागार समिती सदस्यांचे मी मनापासून आभार मानतो. आपले सहकार्य असेच वाढत जावे हीच अपेक्षा.

पुनः ... एकदा आपणा सर्वांना नवीन वर्षाच्या शुभेच्छा देऊन माझ्या मनोगतास येथे विराम देतो.

धन्यवाद

आपला
जितेंद्र देशपांडे

आपल्या प्रतिक्रिया, सुचना आम्हाला जरूर कळवा.
आमचा ईमेल आहे... mms05@ singnet.com.sg

# आपली नविन कार्यकारिणी 2007-08

| नाव | पद |
|---|---|
| श्री. जितेंद्र देशपांडे | अध्यक्ष |
| श्री. अजेय पारखी | उपाध्यक्ष |
| श्री. रणजीत बोराळकर | कार्यवाह, BNG Coordinator |
| कु. प्राची तिसगांवकर | सहाय्यक कार्यवाह |
| श्री. प्रसन्न पेठे | खजीनदार |
| श्री. अजित मुंगरे | सहाय्यक खजीनदार |
| श्री. अभिजीत ठाकुर | जनसंपर्क |
| सौ. सुप्रदा निखार्गे | कार्यक्रम संयोजक |
| सौ. रश्मी पुराणिक | धमाल वीकेन्डर |
| सौ. पल्लवी गोरे | ग्रंथालय संयोजक |
| श्री. अनिल केळकर | कार्यकारिणी सदस्य |
| श्री. सुधीर निखार्गे | कार्यकारिणी स्वयंसेवक |
| श्री. किरण मुंगीकर | कार्यकारिणी स्वयंसेवक |

# वसंतऋतु...

होई वसंताचे आगमन
करी कोकिळा गान
करी फुलांचा सुवास
सुखी आयुष्याची आस

जाता होलिकेचा सण
झाली रंगांची उधळण
शिशिर गळतीची खंत
पालवीने पुसे वसंत

ऋतु असा हा छान
होईल मन प्रसन्न ...
होईल मन प्रसन्न ...

## वसंतऋतु

### माहिती चैत्र महिन्याची

**गुढीपाडवा** (19/03/2007)

चैत्र शुद्ध प्रतिपदा. यालाच आपण वर्षप्रतिपदा असेही म्हणतो. साडेतीन मुहूर्तांपैकी एक म्हणजे गुढीपाडवा. या दिवशी नवीन संवत्सराची सुरुवात होते. या दिवशी घरापुढे गुढी उभारून तिची षोडशोपचारे पूजा करतात. चौदा वर्षे वनवास संपवून अयोध्येत परत आल्यावर श्री रामांच्या स्वागतासाठी अशा गुढी उभारल्या होत्या अशी त्यामागची कथा आहे. या दिवसाची सुरुवात कडुलिंबाची पाने खाऊन करण्याची प्रथा आहे.

**श्री रामनवमी** (27/03/2007)

चैत्र शुद्ध नवमी म्हणजेच रामनवमी. रघुनंदन रामाचा जन्मदिवस. या दिवशी दुपारी बारा वाजता श्री रामांचा जन्म झाला. या दिवशी श्री रामांचे भक्त दिवसभर उपवास करतात. दुपारी रामजन्माच्या *सोहोळयानंतर* भजन कीर्तनाचे कार्यक्रम आयोजीत केले जातात.

**हनुमान जयंती** (02/04/2007)

चैत्र शुद्ध पौर्णिमेला हनुमान जयंती साजरी केली जाते. पवनदेव आणि अंजनीचा मुलगा म्हणजेच पवनसूत म्हणून हनुमान प्रसिद्ध आहे. श्री हनुमान हा रामाचा निस्सीम भक्त होता. ताकद आणि शक्तीची देवता म्हणून हनुमानाची पूजा केली जाते. हनुमान भक्त पहाटे लवकर मंदीरात जाऊन पूजा अर्चा करतात. दिवसभर उपवास करतात. तसेच हनुमानाला तेल, शेंदुर अर्पण करतात.

### माहिती वैशाख महिन्याची

**अक्षय तृतीया** (19/04/2007)

अक्षय तृतीया हा सण वैषाख शुद्ध तृतियेला साजरा केला जातो. हा सण साडेतीन मुहूर्तांपैकी एक म्हणून प्रसिद्ध आहे. हया दिवशी केलेले दान व हवन क्षयाला जात नाही म्हणून यास अक्षय तृतीया म्हटले जाते अशी कथा आहे. भगवान श्री विष्णूंचा सातवा अवतार म्हणजेच परशूराम यांचा जन्मदिवस म्हणूनही अक्षय तृतीया प्रचलित आहे. या दिवशी विष्णूची पूजा, होम, दान करावे असे शास्त्र सांगते.

संकलन : सौ. रश्मी पुराणिक

वसंतऋतु

## मंडळाचे आगामी कार्यक्रम

### एकांकिका महोत्सव

यंदा कार्यकारिणीचा असा विचार आहे की तुमच्या पुढे एका नाटका ऐवजी एकांकिका महोत्सव सादर करायचा. तीन किंवा चार अगदी वेगळ्या प्रकारच्या एकांकिका आम्ही आपल्यासाठी आणण्याचा प्रयत्न करू.

**अधिक माहिती साठी संपर्कः सौ. सुप्रदा निखार्गे 9150 4821**

### सहल

सहल हा कार्यक्रम संपूर्ण परिवाराकरिता असतो आणि आपण सर्वजण दरवर्षी सहलीची आतूरतेने वाट बघतो. यंदाच्या सहलीकरीता आपल्याला एखादे अनुरूप व सोइस्कर ठिकाण माहित असल्यास आम्हाला जरूर सुचवा. आपल्या या वर्षीच्या सहलीची तारीख आम्ही आपल्याला लवकरच कळवू.

**अधिक माहिती साठी संपर्कः श्री. सुधीर निखार्गे 8123 3325**

### क्रिडा

यंदा आपल्यासाठी आम्ही badminton, tennis, chess, bowling, carom, swimming, cricket, अशा विविध स्पर्धा आयोजीत करणार आहोत. लवकरच आम्ही आपल्याला क्रिडा स्पर्धांचे वेळापत्रक पाठवू. तर मग आपल्या आवडत्या खेळाची practice चालू करा !

**अधिक माहिती साठी संपर्कः श्री. प्रसन्न पेठे 9225 2521**

### लंडन महाराष्ट्र मंडळ अमृत महोत्सव

लंडन महाराष्ट्र मंडळ म्हणजे सर्व अंतरराष्ट्रीस महाराष्ट्र मंडळांचे आजोबा! हे आजोबा आपला 75 वा वाढदिवस अर्थात अमृत महोत्सव लंडन येथे यंदा साजरा करत आहेत. या सुमुहूर्तावर लंडन महाराष्ट्र मंडळाने तीन दिवसांचा कार्यक्रम योजीला आहे, 31 Aug ते 2 Sept 2007.

## वसंतऋतु

या प्रसंगी त्यांच्या आनंदात सहभागी होण्याचे आमंत्रण त्यांनी आपल्या सभासदांना दिले आहे. विविधरंगी कार्यक्रम या ठिकाणी त्यांनी आयोजीत केले आहेत. आपल्या मंडळातर्फे काहीतरी कार्यक्रम सादर व्हावा अशी इच्छा देखिल त्यांनी दाखवली आहे.

**अधिक माहिती साठी संपर्कः श्री. अभिजीत ठाकूर 9617 4569**

या सर्व उपक्रमांसाठी आम्हाला गरज आहे आपल्या सहभागाची... सहकार्याची...
**श्रमदानासाठी... संपर्क : कु. प्राची तिसगांवकर 9363 0523**

Advertisements

For Advertisements, please contact Mr. Ranjeet Boralkar on +65 9298 5535